Exh. 1/B

Issue suit summons to the defendants to appear and answer the claim by filing Written Statement of his defense, if any, within 30 days from date of service of summons and for settlement of issues and to produce all documents in his possession of power, vide VIII Rule 1 & 1A of the code of Civil Procedure, 1908 returnable on dtd. 10 /02/2026.

Date 27-01-2026 Sd/-
I/c. CJJD, Radhanagari

दै.रजि.नं.

दाखल ता. .०१.२०२६

दाखल करणार : ॲड.व्ही.टी.धनवडे

रे.क.नं. 12 /२०२६

**मे.दिवाणी न्यायाधीश सो क.स्तर राधानगरी**

**यांचे कोर्टात....**

१) श्री.एकनाथ विठ्ठल पाटील
व.व.६७ धंदा : शेती
रा.सरवडे, ता.राधानगरी
जि.कोल्हापूर
२)श्री.रंगराव मारूती पाटील
व.व.५९ धंदा : शेती
रा.सरवडे, ता.राधानगरी
जि.कोल्हापूर

} वादी

Assistant Suprintendent

| | |
|---|---|
| ३)श्री.उत्तम मारूती पाटील<br>व.व.५०    धंदा : शेती<br>रा.सरवडे   ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर<br>४) श्री.दत्तात्रय विष्णू कोपार्डेकर<br>व.व.६२    धंदा : शेती<br>रा.सरवडे,  ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर<br>५) श्री.पांडुरंग गणपती पाटील<br>व.व.६२    धंदा : शेती<br>रा.सरवडे ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर<br>६) सुगंधा धोंडीराम पाटील<br>व.व.५५    धंदा : शेती व घरकाम<br>रा.सरवडे    ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर | वादी |

Assistant Suprintendent

| | |
|---|---|
| ७)मालुबाई मारूती कोपार्डेकर<br>व.व. ५३ धंदा : शेती व घरकाम<br>रा.सरवडे ता.राधानगरी<br>जि.कोल्हापूर | वादी |

विरूध्द

| | |
|---|---|
| १) श्री.कृष्णात गंगाराम रेपे<br>व.व. ६२ धंदा : शेती<br>रा.सरवडे ता.राधानगरी<br>जि.कोल्हापुर<br>२)श्री.रामचंद्र दत्तू पाटील<br>व.व. ६६ धंदा : शेती<br>रा.सरवडे ता.राधानगरी<br>जि.कोल्हापुर<br>३) श्री.शिवाजी कृष्णा कोपार्डेकर<br>व.व. ६४ धंदा : शेती<br>रा.सरवडे ता.राधानगरी<br>जि.कोल्हापुर | प्रतिवादी |

Assistant Suprintendent

४) श्री.शंकर दत्तात्रय पाटील
व.व. ४७ धंदा : शेती
रा.सरवडे ता.राधानगरी
जि.कोल्हापुर

५) श्री.साताप्पा सदाशिव जरग
व.व. ५० धंदा : शेती
रा.सरवडे ता.राधानगरी
जि.कोल्हापुर

} प्रतिवादी

**दावा रू.२००० /-**

**ज्युरीसडीक्शनसाठी रू.२००० /-**

**दावा हक्कज्ञापन व कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी**

<u>स्पे.रि.ॲक्ट</u> **कलम ३४ व ३८ प्रमाणे**

**<u>यातील वादींचा दावा असा की,</u>**

१)<u>मिळकतीचे वर्णन</u> :

मौजे सरवडे राधानगरी जि.कोल्हापूर येथील खालीलप्रमाणे शेतजमीन मिळकती :

Assistant Suprintendent

| अ.नं. | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रू.पै | पैकी क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९८७ | ०.१९.२० | ०.७५ | ०.१२.८० | ०.५० |
| २ | १९८४ | ०.०९.०० | ०.३१ | ०.०९.०० | ०.३१ |
| ३ | १९८६ | ०.३१.०० | १.४१ | ०.१५.५० | ०.७० |
| ४ | १७३० | ०.२५.०० | ०.१९ | ०.०६.२५ | ०.०५ |
| ५ | १९८५ | ०.०९.०० | ०.६२ | ०.०२.२५ | ०.१६ |
| ६ | १९८५ | ०.०९.०० | ०.६२ | ०.०२.२५ | ०.१६ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या शेतजमीन मिळकती व सदर मिळकतीमधून रस्त्याबाबत प्रतिवादी यांनी मा.तहसिलदार राधानगरी यांचेकडून क्र.जमीन कवि.३२१/२०२५ चे कामी २२.१२.२०२५ इ.रोजी घेतलेला आदेश या दावेचा विषय असून त्यास इथुन पुढे 'दावा मिळकत'अथवा 'सदर मिळकत'असेही संबोधले आहे.

२) वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीपैकी अ.नं.१ ची मिळकत वादी नं.१ यांचे,अ.नं.२ ची मिळकत वादी नं.२ यांची,अ.नं.३ ची मिळकत वादी नं.३ यांचे,अ.नं.४ ची मिळकत वादी नं.४ व ७ यांचे ,अ.नं.५ ची मिळकत वादी नं.५ यांचे,अ.नं.६ ची मिळकत वादी नं.६ यांचे मालकीची व कब्जेवहीवाटीची मिळकत

Assistant Superintendent

होय. सदर मिळकतीमध्ये वादी हे ऊस,भात,इ.पिके सालोसाल घेत आलेले होते व आहेत.

३) सदर वादींचे मालकीचे क्षेत्रामधून कधीही वहीवाटीचा रस्ता आस्तित्वात नव्हता व नाही.असे असताना प्रस्तुत प्रतिवादी नं.१ ते ७ यांनी मे.तहसिलदार सो राधानगरी यांचेकडे क्रमांक/जमिन/कवि .३२५/२०२५ हा अर्ज रस्ता मागणी करीता दाखल केलेला होता.सदर अर्जाचे कामी मा.तहसिलदार यांनी दि.२२.१२.२०२५ इ.रोजी प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर केलेला होता व आहे.

४) वास्तविक प्रस्तुत प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जामध्ये रस्ता अडवलेचा उल्लेख केलेला आहे.तसेच नवीन रस्त्याची मागणी देखील केलेली आहे.सदर प्रतिवादींचे अर्जातील कथनाप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम मधील तरतूदी लागू होत नाहीत. याबाबत वादींनी आक्षेप घेवून देखील तहसिलदार यांनी कायदयातील तरतुदींकडे डोळेझाकपणा केलेला आहे.सरबांधावरून पायवाट देणेचा अधिकार तहसिलदार यांना आहे.परंतू पायवाट मंजुर करताना मागणी करीत असले इसमांना पर्यायी रस्त्या आहे किंवा कसे याबाबत रितसर चौकशी होवून न्यायनिवाडा करणे आवश्यकअसते.

५) वास्तविक प्रतिवादी नं.१ यांचे मालकीचे क्षेत्राला लागून १५० मीटर अंतरावर जुना वहीवाटीचा ३३ फुट रस्ता आस्तित्वात आहे.तसेच शेताजवळ कासारपुतळे गावाकडून आलेला रस्ता त्यांचे शेतातील ओढयाजवळून गेलेला आहे.तसेच प्रतिवादी नं.१ यांचे शेतातून नकाशास नोंद असलेला रस्ता गेलेला आहे.तसेच प्रतिवादी नं.२ ते ५ यांचे शेतालगत १५ मीटर अंतरावर नकाशास

Assistant Suprintendent

नोंद असलेला रस्ता आस्तित्वात आहे.प्रतिवादी यांना पर्यायी व पुरक असा रस्ता उपलब्ध असताना केवळ वादींना नाहक त्रास देणेचे उददेशाने मा.तहसिलदार यांचेकडे खोटया कथनांच्या आधारे अर्ज दाखल करून वादींचे मालकीचे दावा मिळकतीमधून रस्ता मागणी केलेला आहे.

६) मा.तहसिलदार यांचेकडे असले अर्जाचे कामी वस्तुस्थिती पाहाणीमध्ये देखील पर्यायी रस्ते उपलब्ध असलेची बाब समोर आलेली आहे.परंतू त्याबाबत प्रस्तुत तहसिलदार यांनी त्यांचे निवाडयामध्ये एकअवाक्षर देखील नमुद केलेले नाही.याहीवरून महत्वाच्या पुराव्याकडे डोळेझाकपणा तहसिलदार यांनी केलेचे स्पष्ट होत आहे.दावा मिळकतीच्या मालकीशी अगर कब्जेवहीवाटीशी प्रस्तुत प्रतिवादी अगर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्कसंबंध नव्हता व नाही.

७) वास्तविक दावा मिळकत ही शेती प्रयोजनासाठी वापरात आहे.परंतू प्रतिवादी यांनी त्यांचे सोयीने त्यांचे मिळकतीमधून रस्ता तयार केला या कारणावरून वादींनी सुध्दा स्वतःचे मिळकतीमधून रस्ता करू दयावा ही बाब कोणत्याही कायदयाने स्विकारणेजोगी नाही.त्याकारणानेदेखील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ मधील तरतुदी लागू होत नाहीत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ मधील तरतुदीप्रमाणे सरबांधावरून पर्यायी वाट उपलब्ध नसेल तर पायवाट देणेबाबत आदेश तहसिलदार यांना करता येतो. परंतू मा.तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ मधील तरतुदींच्या अधिकारांचा गैरवापर केलेला आहे.तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १४३ अन्वये दाखल केलेला अर्ज हा दावा म्हणून ट्रिट केला जातो.तसेच वादी व प्रतिवादी यांना त्यांचा तोंडी पुरावा तसेच उलटतपास याची पुर्ण संधी देवून न्यायनिवाडा केला

Assistant Superintendent

जातो.परंतू तहसिलदार यांचेसमोर वादींनी त्यांचा तोंडी पुरावा सादर न करता मा.तहसिलदार यांनी प्रतिवादींचा अर्ज मान्य करून अप्रत्यक्षरित्या त्यांचे दावा मिळकतीमध्ये कायदेशीर हक्कअसलेचे घोषित केलेले आहेत. सिव्हील राईटस ठरवणेचा अधिकार हा दिवाणी न्यायालयास असून तहसिलदार यांनी अधिकारांचा गैरवापर केलेला आहे.त्याकारणाने तहसिलदार यांचा दि.२२.१२.२०२५ इ.रोजीचा क्रमांक /जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ मधील आदेश हा अधिकारबाहय,बेकायदेशीर,नॉनेस्ट,व्हाईड अॅब इनिशिओ असा आहे.

८) एकंदरीत दावा मिळकत ही वादींची कायदेशीर मालकीची व कब्जेवहीवाटीची मिळकत असून मा.तहसिलदार यांनी अधिकारबाहय असा आदेश पारीत करून त्याचे आधारे प्रस्तुत प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये आस्तित्वात नसलेला रस्ता दांडगाव्याने तयार करणेची दाट शक्यता आहे. अलिकडे प्रतिवादी यांनी तशी मंडळ अधिकारी सरवडे यांचेमार्फत रस्ता करणेस येणार असलेबाबतची दि.१२.०१.२०२६ इ.रोजीची नोटीस दिलेली आहे.आहे. सदरप्रमाणेचे प्रतिवादींचे कृत्य हे बेकायदेशीर व अनाधिकाराचे असे आहे.

९) प्रस्तुत प्रतिवादी यांचे सदरप्रमाणेच्या बेकायदेशीर कृत्यास आळा बसणेसाठी वादींना प्रतिवादीविरूध्द , "वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीबाबत मा.तहसिलदार राधानगरी यांनी क्रमांक /जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ चे कामी दि.२२.१२.२०२५ इ.रोजी दिलेला आदेश अधिकारबाहय (अल्ट्रा व्हयरस),बेकायदेशीर,नॉनेस्ट,व्हाईड अॅब इनिशिओ असा आहे असे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा ठराव व हुकूमनामा होवून मिळणेसाठी,तसेच "वर कलम १ मधील वादींच्या कब्जेवहीवाटीस प्रतिवादी यांनी क्रमांक

Assistant Suprintendent

/जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ चे कामी दि.२२.१२.२०२५ इ.रोजीच्या आदेशाआधारे हरकत व अडथळा करून रस्ता करू नये अशी कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी व तसा ठराव व हुकूमनामा होवून मिळणेसाठी" प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडत आहे.

१०)**दावेस कारण** :

प्रस्तुत प्रस्तुत प्रतिवादी नं.१ ते ५ यांनी मे.तहसिलदार सो राधानगरी यांचेकडे क्रमांक /जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ हा रस्ता अर्ज दाखल केलेला होता तेव्हा व तदनंतर सदर अर्जाचे कामी मा.तहसिलदार यांनी दि.२२.१२.२०२५ इ.रोजी प्रतिवादी यांचा अर्ज बेकायदेशीररित्या मान्य केला तेव्हा व तदनंतर दि.१२.०१.२०२६ इ.रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांनी मंडळ अधिकारी यांचे मार्फत रस्ता करणेस येणार असलेबाबतची दि.१२.०१.२०२६ इ.रोजीची नोटीस दिलेली आहे तेव्हा व तदनंतर वेळोवेळी प्रस्तुत दावेस कारण घडले आहे.

११)**दावेची आकारणी व तपशिल** :

| | |
|---|---|
| रू.१०००.०० पै | हक्कज्ञापनाची दाद मागणी केलने त्याची ऐच्छिक किंमत सदरी दाखल करून त्यावर बॉम्बे कोर्ट फी कलम ६ (iv)(j) प्रमाणे योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे. |
| रू.१०००.०० पै | कायम मनाई ताकीद होवून मागितली असलेने त्याची ऐच्छिक किंमत सदरी दाखल करून त्यावर बॉम्बे कोर्ट |

Assistant Superintendent

| | |
|---|---|
| | फी अ‍ॅक्ट कलम ६(IV) शेडयुल II आर्टिकल २३ फ नुसार योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावला आहे. |
| रू.२०००.०० पै | एकुण |

१२) कोर्ट फि करिता व ज्युरिसडिक्शन करिता दावेची आकारणी रू.२०००.०० पै केली असुन त्यावर दि बॉम्बे कोर्ट फि अ‍ॅक्ट व सुट व्हॅल्युएशन अ‍ॅक्ट प्रमाणे योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प लावला आहे.

१३) प्रस्तुत वादी ,प्र.वादी ,व दावा मिळकत याच मे.कोर्टाच्या स्थलसिमेत रहात असलेने प्रस्तुतचा दावा या मे.कोर्टास चालवणेचा हक्क व अधिकार आहे.

१४) प्रस्तुत दावा मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये अन्य कोणत्याही कोर्टात वाद प्रलबिंत नाही.यातील वादी व प्रतिवादी यांचेमध्ये कोणी विकलांग नाही.

१५) **सबब वादीची विनंती की** ,

अ. वर कलम १ मध्ये नमुद मिळकतीबाबत मा.तहसिलदार राधानगरी यांनी क्रमांक/जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ चे कामी दि.२२.१२.२०२५ इ.रोजी दिलेला आदेश अधिकारबाहय (अल्ट्रा व्हयरस),बेकायदेशीर,नॉनेस्ट,व्हाईड अ‍ॅब इनिशिओ असा आहे असे हक्कज्ञापन होवून मिळावे व तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

Assistant Suprintendent.

ब. वर कलम १ मधील वादींच्या मालकीच्या शांततामय कब्जेवहीवाटीस प्रतिवादी यांनी क्रमांक /जमिन/कवि/एसआर/३२१/२०२५ चे कामी दि.२२.१२.२०२५ इ.रोजीच्या आदेशाआधारे हरकत व अडथळा करून रस्ता करू नये अशी कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी व तसा ठराव व हुकूमनामा होवूनव्हावा.

क. या दावेच्या निकालापावेतो वर पोटकलम 'ब' मध्ये पार्थिलेप्रमाणे प्र.वादी विरूध्द मनाई ताकीद होवुन मिळावी.

ड. या दावेचा कोर्ट खर्च प्र.वादीकडुन वादींना देववणेत यावा.

ई. जरूर तर दावा दुरूस्तीस परवानगी असावी.

फ. न्यायाचे सर्व हुकुम याच कामी वादीचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे दावा असे.

सोबत वकिलपत्र ,पत्तामेमो ,कागद यादी ,यादीप्रमाणे कागद ,प्र.वादीसाठी नक्ला जोडल्या आहेत.

राधानगरी

दि. २०.०१.२०२६

दावा तयार करणार व दाखल करणार

(अॅड.व्ही.टी.धनवडे )

Assistant Suprintendent

१) EVPnt
२)
३)
४)
५) पार्वती धोंडिबा पाटील
६) ...न.डा.हा.अं.श्री/सौ. ...गंगुबाई धोंडीराम पाटील... यांचा असे दस्तूर
७) ...नि.डा.हा.अं.श्री/सौ. ...मथुराबाई मारुती कोयारडेकर... यांचा असे दस्तूर

## प्र ति ज्ञा

आम्ही यातील वादी नं.१ ते ७ सत्य प्रतिज्ञेवर कथन करते कि,वर नमुद दावेतील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा असे.

१) EvPnt

राधानगरी

२)

दि. २०.०१.२०२६

३) Smtpil

४)

६) ...श्री/सौ....... ...यांचा असे द...

५)

७) ...श्री/सौ.......... ...यांचा असे दस्तूर

## ॲ फि डे व्ही ट

मी यातील वादी नं.२ श्री.रंगराव मारूती पाटील व.व.५९ धंदा : शेती रा.सरवडे.राधानगरी जि.कोल्हापूर देवाच्या शपथेवर ॲफिडेव्हीट करते की, वर नमुद दावेतील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी

दि. २०.०१.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

(ॲड.व्ही.टी.धनवडे)

Assistant Suprintendent

## प्र ति ज्ञा

मी यातील वादी नं.२ श्री.रंगराव मारूती पाटील व.व.५९ धंदा : शेती रा.सरवडे.राधानगरी जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो कि, वर नमुद दावेतील व ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकुर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

दि. २०.०१.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Rangrao Maruti Patil
Age 59 Occu Agri
of Sarvade Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. V. T. Bhamvade.
Adv. Whom I Know personally
Dated 20/1/2026

Assistant Superintendent